महाबीज

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित

CIN:-U01200MH1976SGC018990

संदर्भ : महाबीज/कंस/२०२२/150 दि. ०५/०८/२०२२

प्रति,

विभागिय व्यवस्थापक/ जिल्हा व्यवस्थापक,

म.रा.बि.म.मर्या.---------------- (सर्व)

**विषय :— महाबीज संचालक निवडणुक करीताच्या आचारसंहीता बाबत.**

वरील विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, कृषक भागधारकांचे २ प्रतिनीधी संचालकांच्या निवडणूकीचा कार्यक्रम दि. ०४/०७/२०२२ ते २२/०९/२०२२ या कालावधीत पोस्टल बॅलेट पेपर व्दारे घेणेकरीता कार्यवाही सुरु आहे. उर्वरीत महाराष्ट्र मतदार संघामधुन श्री.वल्लभराव तेजराव देशमुख मु.पो.अमडापुर ता.चिखली जि.बुलढाणा आणि ॲड. विष्णुपंत सुभानराव सोळंके, मु.पो. नागापूर ता. परळी जि. बीड हे दोन उमेदवार निवडणूक लडवित आहे. तथापी अकोला विदर्भ मतदार संघामधुन श्री.प्रशांत विश्वासराव गावंडे, संभाजीनगर अकोला आणि डॉ. रणजित सपकाळ, सपकाळ हॉस्पीटल, सिव्हील लाईन, अकोला हे दोन उमेदवार निवडणूक लडवित असल्यामुळे निवडणुकीच्या मतपत्रिका पोष्टाद्वारे पाठविण्यात येणार आहे. सविस्तर निवडणूकीचा कार्यक्रम महाबीज वेबसाईटवर अपलोड केलेला आहे. या निवडणूकीच्या कालावधीमध्ये कर्मचाऱ्यांकरीता तसेच उमेदवारांकरीता खालील प्रमाणे आचारसंहीता लागू करण्यात आलेली आहे.

**१.महाबीज कर्मचाऱ्यांकरीता आचारसंहीता**

१.कर्मचाऱ्यांनी प्रचारात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या सहभागी होऊ नये तसेच संचालक निवडणूकीकरीता उभे राहणाऱ्या कोणत्याही उमेदवाराकरीता प्रचार करता येणार नाही तसेच मतपत्रिका गोळा करणे व पोष्टामध्ये नेवून टाकणे अशा प्रकारची कामे कर्मचाऱ्यांना करता येणार नाही. कर्मचाऱ्यांनी अश्या प्रकारची कामे करतांना आढळल्यास त्यांचेवर प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल अशा सूचना आपल्या अधिनस्त कार्यालर्यात कार्यरत असणाऱ्यांना कर्मचाऱ्यांना देण्यात याव्यात.

**२. उमेदवाराकरीता आचारसंहीताबाबत**

निवडणूक प्रकिया पुर्ण होण्याच्या तारखेपर्यंत उमेदवारांनी अनुपालन करण्याविषयीची मार्गदर्शन तत्वे :—

१) महामंडळाची वाहने व कर्मचारी वर्ग किंवा यंत्रणा व सुविधा याचा निवडणूक प्रचार विषयक कामासाठी वापर करण्यात येऊ नये.

२) साध्य केलेल्या उद्दिष्टाबाबत महामंडळाच्या खर्चात कोणतीही जाहीरात देऊ नये.

३) मतदारास आर्थिक किंवा अन्य प्रकारचे कोणतेही प्रलोभन दाखवण्यात येऊ नये.

४) मतदाराच्या जातीय भावनांना आवाहन करण्यात येऊ नये.

५) लाच देणे, अवाजवी प्रभाव टाकणे, मतदारांना धाक/दडपशाही दाखविणे, खोटया नांवाने मतदान करणे या सारख्या भ्रष्ट प्रथा किंवा निवडणूक विषयक अपराध करण्यास प्रतिबंध आहे.

६) पोष्टाव्दारे पाठविण्यात येणाऱ्या मतप्रत्रिकाच्या आवक जावक कायदेशीर प्रक्रियामध्ये वैयक्तीक हस्तक्षेप करण्यास प्रतिबंध आहे. उल्लंघन केल्यास संबंधिता विरुध्द उमेदवारी अपात्रतेशिवाय भारतीय दंडविधानाच्या तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

७) हयाशिवाय महामंडळाचे संचालकांच्या निवडणूकी विषयीचे नियम व अधिनियम हयांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे आचारसंहीतेबाबत आपले कार्यालयातील कर्मचाऱ्यांना तसेच उमेदवारांना अवगत करण्यात यावे.

M.S.S.C.LTD.AKOLA महाबीज SECRETARIAL DEPT

म.रा.बि.म.मर्या करीता

Verma

(विनय वर्मा)

निवडणुक निर्णय अधिकारी तथा कंपनी सचिव

प्रतीलीपी :

१) महाव्यवसथापक------------(सर्व) महाबीज अकोला यांच्या माहितीस्तव.

२) श्री. प्रशांत विश्वासराव गावंडे, संभाजीनगर अकोला उमेदवार अकोला विदर्भ मतदार संघ

३) डॉ. रणजित निळकंठराव सपकाळ, सपकाळ हॉस्पीटल, सिव्हील लाईन, अकोला. अकोला विदर्भ मतदार संघ

४) श्री. वल्लभराव तेजराव देशमुख, मु.पो.अमडापुर ता.चिखली जि.बुलढाणा उर्वरीत महाराष्ट्र मतदार संघ

५) ॲड. विष्णुपंत सुभानराव सोळंके मु.पो.नागापूर ता. परळी जि. बीड उर्वरीत महाराष्ट्र मतदार संघ

६) मा. व्यवस्थापकीय संचालक यांना त्यांचे स्विय सहायकामार्फत माहितीस्तव सविनय सादर.